२०००-०९

९८/११/२००१

जा. क्र. प्राशि/प्राशि/खाप्राशा-अनु/पीआर/
२००१/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय:
दिनांक : 31 MAR 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद ..पुणे........
प्रशासन अधिकारी
म. न. पा. शिक्षण मंडळ.

विषय: शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित जिल्हा परिषद क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांना २०००-२००१ या वर्षात अनुदान तत्वावर आणणे.

---

संदर्भ:

१. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएनएस/७०८८[८७८९]प्राशि१ दि. २८ एप्रिल, १९८९

२. शा. नि. क्र. व्हीएनएस-१०२७/२२५१/प्राशि-१, दि. ४ मार्च, १९९८

३. शा. नि. क्र. पीआरई-१०२०/२३८५/प्राशि-१ दि. १७ ऑक्टोबर, २०००

४. शा. नि. क्र. व्हीएनएस-१०००/१४५५/प्राशि-१ दि. ८ नोव्हेंबर, २०००

५. शासनाकडील शुद्धिपत्रक क्र. पीआरई/२३८५/प्राशि-१ दि. २३ डिसेंबर, २०००.

६. मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील क्र. बीयुडी-२०००/२०००-२००१/प्राशिस-२००/[एक] दि. ३०. ३. २००१. चे आदेश.

वरील विषयासंबंधीची सर्व संदर्भाधीन पत्रे कृपया अवलोकनी घ्यावीत.

मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील संदर्भ क्र.६ नुसार आपल्या जिल्ह्यातील सन १९९५-९६ व १९९६-९७ या वर्षी मान्यता दिलेल्या सोबतच्या यादीतील विनाअनुदान खाजगी प्राथमिक शाळांना अनुक्रमे १००% व २०% अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

सदरचे अनुदान हे खाली नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

अटी:

१] शासन मान्यतेच्या व अनुदानाच्या विहित अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्या पाहिजे.

२] शाळेत आवश्यक ते सर्व अभिलेख यथानियम अद्ययावत ठेवले असावेत आणि लेखाविषयक हिशेब लेखापरीक्षण चार्टर्ड अकाउंटंटकडून प्रमाणित केलेले असले पाहिजे.

३] संस्थाचालकांना अनुदान मंजूर व्हावे म्हणून न्यायालयात दावे अगर याचिका दाखल केलेल्या नसाव्यात.

४] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी अथवा गैरव्यवहारासंबंधीच्या तक्रारी नसाव्यात.

...२...

५] प्राथमिक शिक्षणविषयक अधिनियम आणि शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा. विद्यार्थ्यांचा प्रवेश इत्यादी] काटेकोरपणे पालन केलेले असावे.

६] अनुदानाच्या निश्चितीमुळे जादा अनुदान रक्कम जमा झाली आहे असे आढळून आल्यास ती रक्कम भविष्यात प्रदान होणाऱ्या वेतन-वेतनेतर अनुदानातून समायोजित करून अथवा इतरप्रकारे शासनास परत करण्याची हमी संस्थेने दिलेली असावी.

७] संबंधित प्राथमिक शिक्षकांची नियुक्ती केलेले शैक्षणिक अर्हता असलेले व विहित वयोमर्यादेतील शिक्षक नियुक्त केलेले असावेत. तसेच निकषानुसार सक्षम अधिकाऱ्यांनी मान्य केलेली असावीत तसेच शिक्षकांची भरती करताना शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या आरक्षण विषयक नियमांचे पालन केलेले असावे.

यापुढे शाळा प्रतिवर्षी अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून टप्प्याटप्प्याने अनुदानावर येण्यास पात्र राहतील.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

[स्थलप्रतीवर मा. शि. उ. सं.
पु. वि. पुणे यांची स्वाक्षरी आहे]

प्रत : मुख्याध्यापक

मुख्याध्यापक, महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर अंतर्गत प्राथमिक शाळा सासवडवस्ती ... हडपसर पुणे.

आवक दि ९/४/२००९ by Post.